# कॉक्सिटचा राष्ट्रीय एकता दौडमध्ये उत्साही सहभाग

लातूर- कॉक्सिटच्या विद्यार्थ्यांनी शहरात काढण्यात आलेल्या राष्ट्रीय एकता दौड फेरीमध्ये उत्साहात सहभाग घेवून एकात्मतेचा संदेश दिला.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कॉक्सिटमध्ये उपप्राचार्य डॉ. बी.एल. गायकवाड, उपप्राचार्य एन.एस.झुल्पे यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा.बी.बी.देवडे, प्रा.टी.एस.खरबड, प्रा.आय.एम.काझी , प्रा.एन.व्ही.मोरे, प्रा.डी.आर.सोमवंशी, श्री.श्रीकांत पवार व इतर शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

३१ ऑक्टोबर हा दिन राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा करण्याचे आवाहन जिल्हाधिका-यांनी केले. याला प्रतिसाद म्हणून कॉक्सिटने उत्साहात सहभाग नोंदविला. क्रीडा संकुलमध्ये जिल्हा पोलिस अधिक्षक पांडुरंग पोले व जिल्हा पोलिस अधिक्षक ज्ञानेश्वर चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली. क्रीडा संकुल ते शिवाजी चौक-गांधी चौक-टाऊन हॉलपर्यंत काढण्यात आलेल्या राष्ट्रीय एकता दौड फेरी काढण्यात आली. टाऊन हॉलला राष्ट्रीय एकतेची शपथ देण्यात आली व राष्ट्रगीताने एकता दौड कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला..